RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक १(२)] शुक्रवार, जानेवारी १, २०१६/पौष ११, शके १९३७ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.**—महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . . . | १-२ |

दिनांक ३० डिसेंबर २०१५ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**नि. ज. जमादार,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९४७ चा ६२. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सहासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०१५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९४७ चा अधिनियम क्रमांक ६२ यामध्ये कलम ८ब समाविष्ट करणे.

**२.** महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम याच्या कलम ८अ नंतर पुढील कलम जादा दाखल करण्यात येईल :— १९४७ चा ६२.

विवक्षित क्षेत्रांमध्ये स्थित असलेल्या जमिनीस कलमे ७, ८ आणि ८अअ लागू नसणे.

"**८ब.** महानगरपालिका किंवा नगरपरिषदांच्या सीमांमध्ये स्थित असलेल्या जमिनीस किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या तरतुदींन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये नियुक्त केलेल्या किंवा घटित केलेल्या विशेष नियोजन प्राधिकरणाच्या किंवा नवीन नगरविकास प्राधिकरणाच्या अधिकारितेमध्ये स्थित असलेल्या जमिनीस आणि तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये तयार करण्यात आलेल्या यथास्थिति, प्रारूप किंवा अंतिम प्रादेशिक योजनेमध्ये निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक किंवा इतर कोणत्याही अकृषिक वापरासाठी नेमून दिलेल्या कोणत्याही जमिनीस कलमे ७, ८ आणि ८अअ मधील कोणतीही बाब लागू होणार नाही : १९६६ चा महा. ३७. १९६६ चा महा. ३७.

परंतु, कोणतीही व्यक्ती, महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०१५ अंमलात आल्याच्या दिनांकापूर्वी अधिसूचित केलेल्या प्रमाणक्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र असलेल्या, उपरोक्त विनिर्दिष्ट क्षेत्रांमध्ये स्थित असलेल्या जमिनीच्या कोणत्याही खंडाचे, असा खंड, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ या अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये, नियोजन प्राधिकरणाने किंवा, यथास्थिति, जिल्हाधिकाऱ्याने मंजूर केलेला पोट-विभाग किंवा रेखांकन यामुळे निर्माण झाला असल्याखेरीज, हस्तांतरण करणार नाही.". २०१६ चा महा.२. १९६६ चा महा. ३७.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG /2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक १(२)] शुक्रवार, जानेवारी १, २०१६/पौष ११, शके १९३७ [पृष्ठे २, किंमत : रुपये २७.००

## असाधारण क्रमांक २

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Prevention of Fragmentation and Consolidation of Holdings (Amendment) Act, 2015 (Mah. Act No. II of 2016), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

N. J. JAMADAR,
I/c. Secretary (Legislation)
to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. II OF 2016.

(First published, after having received the assent of the Governor in the "*Maharashtra Government Gazette*", on the 1st January, 2016.)

An Act further to amend the Maharashtra Prevention of Fragmentation and Consolidation of Holdings Act.

LXII of 1947. WHEREAS it is expedient further to amend the Maharashtra Prevention of Fragmentation and Consolidation of Holdings Act, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Sixty-sixth Year of the Republic of India as follows :—

Short title. **1.** This Act may be called the Maharashtra Prevention of Fragmentation and Consolidation of Holdings (Amendment) Act, 2015.

Insertion of section 8B in LXII of 1947. **2.** After section 8A of the Maharashtra Prevention of Fragmentation and Consolidation of Holdings Act (LXII of 1947), the following section shall be inserted, namely :—

Sections 7, 8 and 8AA not to apply to land situated in certain areas. "**8B.** Nothing in sections 7, 8 and 8AA shall apply to the land situated within the limits of a Municipal Corporation or a Municipal Council, or to the land situated within the jurisdiction of a Special Planning Authority or a New Town Development Authority appointed or constituted

under the provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 or any other law for the time being in force, and also to any land allocated to residential, commercial, industrial or any other non-agricultural use in the draft or final Regional plan prepared under the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 or any other law for the time being in force : Mah. XXXVII of 1966. Mah. XXXVII of 1966.

Provided that, no person shall transfer any parcel of land situated in the areas specified above, which has area less than the standard area notified before the date of coming into force of the Maharashtra Prevention of Fragmentation and Consolidation of Holdings (Amendment) Act, 2015, unless such parcel is created as a result of sub-division or layout approved by the Planning Authority or the Collector, as the case may be, under the provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 or any other law for the time being in force.". Mah. II of 2016. Mah. XXXVII of 1966.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.